सूचना का अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
# बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

## रामाआ- २०१९/तक्रार क्र. बीएम- ९९/०१

**तक्रारकर्ता श्री. सुनिल रघुनाथ राहिंज**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा अतिरिक्त कार्यकारी अभियंता (तां.आ.विभाग)**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, महावितरण,
प्लॉट क्र.जी-९, प्रकाशगड, प्रा.अनंत काणेकर मार्ग,बांद्रा (पूर्व) मुंबई -४०० ०५१.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा वरिष्ठ व्यवस्थापक (मांस/तांआ)**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, महावितरण,
प्लॉट क्र.जी-९, प्रकाशगड, प्रा.अनंत काणेकर मार्ग,बांद्रा (पूर्व) मुंबई -४०० ०५१.

## तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : ०१.०७.२०२४

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. १८.०६.२०२४ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

आयोगाने यापूर्वी अपील क्र. MHSICMU/२०१८/M/००४२१८ प्रकरणी आयोगाने दि.१८.१२.२०१८ रोजी पुढीलप्रमाणे आदेश पारित केले आहेत :-

*"जन माहिती अधिकाऱ्यांना असे आदेश देण्यात येत आहेत की, त्यांनी दि. ०७.०१.२०२१ पर्यंत या प्रकरणी उपलब्ध असलेली माहिती, अपिलार्थींना रजिस्टर पोस्टाने विनामुल्य पाठवावी. या आदेशासह अपील मान्य करुन निकाली काढण्यात येत आहे."*

उक्त आदेशानुषंगाने तक्रारकर्ता यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी दि. १३.०२.२०२१ रोजी आयोगासमोर तक्रार अर्ज दाखल केला. सदर तक्रारीवर जन माहिती अधिकारी यांच्याकडून आयोगाने दि.०४.०४.२०१९ च्या पत्रानुसार अहवाल मागविण्यात आला. जन माहिती अधिकारी यांनी दि.१३.०३.२०१९ रोजी प्राप्त झालेली माहिती अपिलार्थींना पाठविली व आयोगास दि. १५.०४.२०१९ च्या पत्रानुसार आयोगास कळविले की, संबंधीत विभागाकडून प्राप्त झालेली माहिती त्वरीत अपिलार्थींना पुरविण्यात आलेली आहे.

सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. तथापि, त्यांनी दि. २४.०६.२०२४ चे पत्र आयोगास सादर केले की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांनी मागितलेली माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. सबब, माझी कोणतीही तक्रार शिल्लक नाही.

..२/-

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित असून त्यांनी दि. २६.०६.२०२४ रोजीचे निवेदन आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, आयोगाच्या आदेशाप्रमाणे अपिलार्थींना दि. १३.०३.२०१९ रोजी तक्रारकर्त्यांना माहिती देण्यात आलेली आहे.

या तक्रारीसंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, तक्रारकर्त्यास माहिती देण्यात आलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission
सत्यमेव जयते
Greater Mumbai

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : ०२.०७.२०२४**